

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL


**SPECIAL ISSUE**

On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT IN ANCIENT TO MODERN PERIOD

27th January 2018

(Book I)



*Editor*
**Mr. Pawde K. W.**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF HISTORY
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS

1 प्राचीन ते आधुनिक काळातील महिला सबलीकरण / डॉ. गोविंद देशमुख |7
2 महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि स्त्री सबलीकरण /प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे |11
3 सातवाहन राज्यकर्त्यांचा स्त्री देवतांविषयक दृष्टीकोन / डॉ.भेलोंडे जगदिश व्यंकटराव |13
4 समाज सुधारक आणि महिलांचे सबलीकरण / डॉ.शिवाजी सोमल्या पवार |15
5. फातीमा बेगम : भारतातील पहिल्या महिला चित्रपट दिग्दर्शिका / प्रा.हमीद उमरअली काझी |19
6. Satyakka's contribution to Vachana Literature / Dr. Nalini Avinash Waghmare |23
7. Contribution of Revolutionary Women in Indian History / Dr. Kamble R.S. |26
8 भारतीय स्वातंत्र्य चळवळीत क्रांतीकारी स्त्रीयांचे योगदान / डॉ. आर. आर. पिपंळपल्ले |28
9 भारतीय ऐतिहासिक परिप्रेक्षातील कर्तृत्वान स्त्रियां : एक आढावा / प्राचार्य डॉ. बबन पवार |31
10. प्राचीनवाङ्मय आणि स्त्रीभ्रुणहत्या / प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के |33
11. हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यात गोदावरीबाई टेके व दगडाबाई शेळेके यांचे योगदान / प्रा. डॉ. अंगद पवार |35
12. हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. आर. एस. पारवे |39
13. हमीद दलवाई – मुस्लिम स्त्री चळवळ / प्रा.वाईकर एस.बी |42
14. तथागत गौतम बुद्धांची स्त्रिविषयक भूमिका / प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे |45
15. शैक्षणिक धोरण आणि महिला सबलीकरण / डॉ.विलास जाधव & प्रा.वाय.डब्ल्यू.शेख |48
16. महिला सबली करणासाठी पं.रमाबाईचे योगदान / डॉ.नंदकुमार ज्ञानोबा जाधव |50
17. ज्ञानोदय आणि विधवा पुनर्विवाह चळवळ (इ.स.१८५१-१८६१) / डॉ.उत्तम पठारे |53
18. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठवाड्यातील महिलांचे योगदान / डॉ. नरेंद्र देशमुख |57
19. स्त्री पुरुष समानतेच्या पुरस्कर्त्या : ताराबाई शिंदे / डॉ. भालेराव जी पी |59
20. हैद्राबाद मुक्ती आंदोलानातील महिलांचे योगदान / प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव |61
21. हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग / डॉ.किशन कैंद्रे |63
22. प्रबोधनकालीन स्त्रीयांचे शैक्षणिक उत्थान / डॉ. मोरे डी. ए. |68
23. स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. पी.बी. सिरसट |70
24. प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्वान स्त्रिया / डॉ. एच.टी. सातपुते |72
25. प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्वान स्त्रिया / प्रा.सविता तुकाराम तावडे |75
26. स्वातंत्र्यलढयातील महिलाचा सहभाग / डॉ. दत्ता उध्दव जाधव |78
27. धाडसी व्यक्तिमत्व गोदावरीबाई टेके / प्रा.डॉ. बाबजे मंजुषा मुकुंदराव |82
28. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री-विषयक विचार / डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत |84
29. भारतीय स्वातंत्र्य लढयातील कस्तुरबा गांधीची भूमिका / प्रा.दिनकर मोहनराव रणदिवे |86
30. हैदराबाद मुक्ती संग्रमामध्ये दगडाबाई शेळकेचे योगदान / प्रा.डॉ. विजया साखरे |88
31. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शिक्षणाच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे प्रयत्न / गडगे शांता रंगनाथ |91
32. Empowerment of muslim women and law. / Dr.ShaikhHussain Imam |94
33. सातारच्या प्रतिसरकारमधील एक स्वातंत्र्य सेनानी राजमती पाटील यांचे कार्य / प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम |98
34. प्रशासकीय धोरण आणि महिला सबलीकरण / प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख |101
35. हैदराबाद मुक्ती लढ्यातील बीड जिल्ह्यातील महिलांचा राजकीय सहभाग. / प्रा.डॉ.साबंत पी.डी. |104

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

28.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री-विषयक विचार

डॉ. सुमित शिवमूर्ती रजपूत
इतिहास विभाग प्रमुख
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर,
ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

## प्रस्तावना

उत्तर वैदिक काळात समाजामध्ये विषमता वाढत गेली. मध्ययुगीन कालखंडात विषमतेची ही तीव्रता अधिक प्रमाणात वाढत गेली. आधुनिक कालखंडाच्या सुरुवातीस विषमतेचा विपरीत परिणाम झाला. भारतीय समाजामध्ये निर्माण झालेली विषमता १९ व्या शतकामध्ये कमी करून परिवर्तन घडवून आणण्याचे खरे श्रेय महात्मा ज्योतीराव फुले. राजर्षी शाहू महाराज. डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ. समतेचा पुरस्कार करणाऱ्या समाज सुधारकांना जाते. डॉ.आंबेडकरांनी राजकीय. सामाजिक. धार्मिक समतेच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी अस्पृश्यांप्रमाणेच करुणामय जीवन जगणाऱ्या स्त्रियांमध्ये आपल्या विचारांद्वारे जाणीव आणि जागृती निर्माण करण्याचे कार्य पार पाडले. त्यांनी कायद्याने हिंदू स्त्रियांना समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी प्रस्थापितांच्या विरोधात जाऊन त्यांनी हिंदू कोड बिलाची रचना केलेली होती. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भाषणातून आणि त्यांच्या लिखाणातून डॉ. आंबेडकरांच्या स्त्री उन्नतीविषयक विचारांवर प्रकाश पडतो. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ.आंबेडकरांच्या स्त्री-विषयक विचारांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## डॉ.आंबेडकरांचे मुलींच्या शिक्षणाविषयक विचार

२७ डिसेंबर १९२७ रोजी महाड मधील सत्याग्रह परिषदेत डॉ.आंबेडकर अस्पृश्य स्त्रियांना उपदेश करताना म्हणाले की, ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत. त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. म्हणून आपली पुढील पिढी जर तुम्हांस सुधारावयाची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका. असे ते स्त्रियांना बजावून सांगतात.[१] यावरून त्यांची मुलींच्या शिक्षणाविषयी दाखविलेली आस्था व पुढील पिढी जर सुशिक्षित बनवायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव यातून स्पष्टपणे दिसून येते. तसेच १९२० मध्ये कागल संस्थानातील सानगाव येथील परिषदेत प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता लवकरात लवकर सक्तीचे आणि मोफत शिक्षण द्यावे असा ठराव केला. त्यांना स्त्री शिक्षणाविषयी विशेष आस्था असल्याने त्यांनी व्यक्तीगत पातळीवरून देखील स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी प्रयत्न केले.[२] तसेच शिक्षण नसल्यामुळे अस्पृश्य स्त्रियांना लहान मुलांना घरी ठेवून मोल-मजुरी करावी लागते. अज्ञानामुळे त्यांची योग्य स्वरूपात जोपासना होऊ शकत नाही. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय करण्यात यावी अशा प्रकारची मागणी डॉ.आंबेडकरांनी १९२० च्या नागपूर मधील अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेत केली होती.[३]

## देवदासी प्रथेवर डॉ.आंबेडकरांचे विचार

१६ जून १९३६ रोजी रात्री पोयबावडीवरील दामोदर हॉलमध्ये आयोजित मुरळ्या, जोगतिणी, देवदासी, वाघे, पोतराज, भुते इ. लोकांची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला डॉ. आंबेडकर सुद्धा उपस्थित होते. या सभेमध्ये प्रारंभी काही देवदासी मुरळ्या, पोतराज, व वाघे यांची भाषणे होऊन त्यांनी या व्यवसायापासून परावृत्त होण्याची आपल्या बंधुभगिनींना विनंती केली.[४] तसेच साधारणतः या वर्गातील सर्व स्त्रिया सदाचरणाने उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्यामुळे अनैतिकरितीने आपला निर्वाह कशा स्वरूपात करतात याची माहिती डॉ.आंबेडकरांना करून देण्यात आली. नंतर डॉ.आंबेडकर या बैठकीतील लोकांना उपदेश देण्यासाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी सभेतील प्रारंभीच्या विचारांवर प्रकाश टाकत असताना बैठकीला उद्देशून बोलले की, धर्माच्या नावाखाली अनैतिकरितीने आपला निर्वाह करणाऱ्या अशा तुम्ही स्त्रिया आहात. अशाप्रकारे आपला निर्वाह करणाऱ्या वर्गाने जगात काय चालले आहे. हे समजून जिज्ञासा दाखवावी व आपला चरित्रक्रम सुधारावा. अशा प्रकारची विनंती त्यांनी या लोकांना केली होती.[५]

## डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बिल

१९४१ मध्ये 'राव समिती' ने हिंदू कायद्यांमध्ये सुसूत्रीपणा आणून हिंदू कोड बिल तयार केले. पण दुसऱ्या महायुद्धामुळे त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. पुढे भारतीय राज्य घटनेचे कार्य पूर्ण झाल्यानंतर डॉ.आंबेडकरांनी याकडे लक्ष दिले व हिंदू स्त्रियांच्या हक्कांसाठी त्यांनी आग्रह धरला. हिंदू कोड बिलाचे चार निरनिराळे भाग करून चार कायदे केले. ते म्हणजे १) हिंदू विवाह कायदा, २) हिंदू वारसा हक्क कायदा, ३) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा, ४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा असे चार कायदे संहिता १९५५-५८ मध्ये संमत करण्यात आले. यालाच 'हिंदू कोड बिल' असे म्हणतात.[६] या कायद्याच्या माध्यमातून डॉ.आंबेडकरांनी उत्तर वैदिक काळापासून हिंदू स्त्रियांवर होणाऱ्या विविध



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

स्वरूपाच्या अन्यायाला वाचा फोडली व त्यांना मानवता वादाचा हक्क प्राप्त करून देण्यात आला.

## डॉ.आंबेडकर आणि विधी मंडळातील स्त्री उद्धाराचे कार्य

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक समता निर्माण करत असताना समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला. त्यांनी दलितांच्या उद्धाराबरोबरच विधी मंडळात काम करत असताना समाजातील स्त्रीयांना देखील त्यांचे हक्क प्राप्त करून देण्याचे कार्य त्यांनी पार पाडले. सन १९२८ साली स्त्री-कामगारांना प्रसुतीकाळात सवलती देण्याच्या विधेयकाला पाठिंबा देतेवेळी डॉ. आंबेडकर म्हणाले, "प्रत्येक स्तीला प्रसुतीपूर्व काळात व प्रसुतीनंतरच्या काही ठराविक काळापर्यंत विश्रांती मिळणे हे राष्ट्राच्या दृष्टीने हिताचे आहे."[७] तसेच बिलाचा फायदा स्त्री कामगारांप्रमाणेच उद्योग व्यवसायात व शेती क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना देखील मिळावयास हवा असे त्यांनी आपले मत मांडले.[८] यावरून डॉ.आंबेडकरांचे स्त्रियांच्या आरोग्यावर व त्यांना देण्यात येणाऱ्या सवलतींविषयी असणाऱ्या जाणीव जागृतीविषयी आपणांस कल्पना येते.

## निष्कर्ष

१. डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना शिक्षण मिळाले तरच समाजोन्नती लवकर होईल म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणावर भर दिलेली दिसून येते.

२. डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेले हिंदू कोड बिल म्हणजे हिंदू स्त्रियांच्या समाजपरिवर्तनासाठी टाकलेले एक पाऊल होते.

३. डॉ. आंबेडकरांचे विचार पहाता त्यांनी समाजात वाढणाऱ्या देवदासी प्रथेविषयी अनैतिकतेला आळा घालण्यासाठी या प्रथेला कडाडून विरोध केला.

## संदर्भ सूची

१. वसंत मुन. हरी नरके आणि इतर (संपादक); डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणं खंड १८, भाग-१ (१९२०-१९३६); उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग; महाराष्ट्र शासन : मुंबई; २००२ पृष्ठ क्र.१४३
२. सी. एच. निकुंभे, समाजप्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर : सुगावा प्रकाशन, पुणे. १४ एप्रिल २००५. पृष्ठ क्र. १५९.
३. सी. एच. निकुंभे, समाजप्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर : सुगावा प्रकाशन. पुणे, १४ एप्रिल २००५, पृष्ठ क्र. १६४, १६५.
४. कित्ता. पृष्ठ क्र.१४८
५. कित्ता. पृष्ठ क्र.१४९
६. गाठाळ एस. एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स्, औरंगपुरा, जून २०१५.
७. फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर १९८५.
८. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १४ एप्रिल १९६६

□□□

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.